# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**खाजगी रक्तपेढ्यांमध्ये नियमाचे पालन होत नसल्याबाबत**

**(१) ५०९३३ (०५-०५-२०१६). श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खाजगी रक्तपेढ्यांमध्ये अनेकदा नियमाचे पालन होत नसल्याचे दिनांक २९ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) तसेच नागपूर शहरात खाजगी रक्तपेढ्यांकडून रक्तासाठी मोठ्या प्रमाणात पैसे घेतले जातात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खाजगी रक्तपेढयांमध्ये अनियमितता आढळल्यास आर्थिक दंड देण्याचा अधिकार औषध व अन्न प्रशासनाला दिला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यावर शासन काय कारवाई करणार आहे ?

**श्री.गिरीश बापट (१८-०८-२०१८) :** (१) हे खरे नाही.

अशी बाब अन्न व औषध प्रशासनाच्या निदर्शनास आलेली नाही.

(२) हे खरे नाही. अशा प्रकारची तक्रार अन्न व औषध प्रशासनास प्राप्त झालेली नाही.

(३) व (४) औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० व त्याअंतर्गत नियम १९४५ मध्ये आर्थिक दंड आकारण्याची तरतुद नाही.

कायद्यातील तरतुदीचे उल्लंघन झाल्यास तरतुदीनुसार कारणे दाखवा नोटीस देऊन उल्लघंनानुसार परवाना निलंबन/रद्द करण्याची तरतुद आहे व त्यानुसार प्रशासनामार्फत कारावाई केली जाते.

---

**धरणाकँम्प (ता.पनवेल, जि.रायगड) येथील कोयना धरण प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाबाबत**

**(२) ५५२०६ (२२-०९-२०१६) श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धरणाकँम्प (ता.पनवेल, जि.रायगड) येथील कोयना धरणामुळे विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांचे योग्य पुनर्वसन झाले नसून शिक्षण व आरोग्य यासारख्या मुलभूत सुविधाही त्यांना अद्याप मिळाल्या नसल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धरणाकँम्प मधील रायगड जिल्हा परिषदेच्या दोन्ही शाळेच्या मोडकळीस आलेल्या धोकादायक इमारतीत विद्यार्थ्यांना शिक्षण घ्यावे लागत असून शिक्षकांनाही पायाभूत सुविधा मिळत नाही,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त शाळेच्या धोकादायक इमारतीच्या पुनर्बांधणीला प्रशासकीय मंजुरी मिळूनही कामाला सुरुवात झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुषंगाने प्रकल्पग्रस्तांचे योग्य पुनर्वसन करून विद्यार्थ्यांना व शिक्षकांना पायाभूत सुविधा मिळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२३-१०-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) हे खरे नाही.

शाळेत चार नवीन वर्गखोल्यांचे बांधकाम करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील खासगी व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये सीसीटीव्ही बसविणेबाबत**

**(३) ५५४६६ (३०-११-२०१६) श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अल्पवयीन मुलींवर होत असलेले लैंगिक अत्याचाराचे प्रमाण वाढले असून याची उच्च न्यायालयाने गंभीर दखल घेवून राज्यातील खासगी व्यवस्थापनाच्या प्राथमिक,

माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांमध्ये सीसीटीव्ही बसविणे बंधनकारक करा अशी सूचना दिनांक ११ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास केली असून त्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी शिक्षणाधिकारी, विभागीय उपसंचालक आणि संचालक यांच्यावर सोपविण्यात आली असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्याची सक्ती शहरी भागात असावी, ग्रामीण भागातील शाळांना सक्ती करु नये अथवा ग्रामीण भागातील शाळांमध्ये सीसीटीव्ही बसविण्यासाठी शासनाने काही प्रमाणात अनुदान द्यावे अशी मागणी कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक महासंघाचे सरचिटणीस यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (२) बाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०४-१०-२०१८) :** (१) होय.

(२) व (३) मा.उच्च न्यायालयाच्या निदेशांनुसार खाजगी व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये आवश्यकतेनुसार सी.सी.टी.व्ही बसविण्याच्या सुचना दिनांक ७ एप्रिल, २०१६ च्या शासन निर्णयाद्वारे देण्यात आलेल्या आहेत. तसेच याकरिता शासनाकडून अनुदान देण्यात येणार नाही ही बाब स्पष्ट करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे जिल्हा परिषदेच्या शाळांच्या वर्ग खोल्यांना मंजुरी व निधी देण्याबाबत**

**(४) ५५५९६ (२४-०८-२०१६). श्री.अजित पवार (बारामती), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हा परिषदेने साडेतीनशे वर्ग खोल्या बांधण्याचा प्रस्ताव दिला असता केवळ तीन वर्ग खोल्या बांधण्यास मंजूरी व अनुदान देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वर्ग खोल्या विना विद्यार्थ्यांच्या ज्ञानार्जनावर विपरित परिणाम होऊ नये याकरिता शासनाने पुणे जिल्हा परिषदेमार्फत मागणी केलेल्या शाळांच्या वर्ग खोल्यांना पूर्ण क्षमतेने मंजूरी व निधी देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०४-१०-२०१८) :** (१) व (२) सर्व शिक्षा अभियानांतर्गत सन २०१५-१६ मध्ये ३ वर्गखोली बांधकामास मंजूरी देण्यात आली होती. तथापि सन २०१६-१७ व २०१७-१८ साठी अनुक्रमे ९७ व ६९ बांधकामास मंजूर प्रदान करण्यात आली आहे. त्यापैकी ६९ बांधकामे पूर्ण असून ९७ बांधकामे प्रगतीपथावर आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिंधुदूर्ग जिल्हयातील प्राथमिक शाळांच्या इमारती धोकादायक असल्याबाबत**

**(५) ५६३११ (२२-०९-२०१६). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदूर्ग जिल्हयातील १६९ प्राथमिक शाळांच्या इमारती धोकादायक असल्याची माहिती प्राथमिक शिक्षणाधिकाऱ्यानी शासनाला तसेच जिल्हा परिषद सिंधुदूर्ग यांना माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान आपल्या अहवालाव्दारे कळविली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२३-१०-२०१८) :** (१) हे खरे नाही.

शिक्षणाधिकाऱ्यांनी सिंधुदूर्ग जिल्हयातील १५५ शाळांच्या बांधकाम/ दुरूस्तीचा प्रस्ताव सन २०१६-१७ मध्ये जिल्हा परिषदेमार्फत जिल्हा नियोजन समितीला सादर केला होता.

(२) संदर्भिय कामांसाठी रू.४९२ लक्ष निधी उपलब्ध करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील खाजगी शाळांकडून होणारी शुल्कवाढ रोखण्याबाबत**

**(६) ६२२४६ (२२-०९-२०१६). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खाजगी शाळांकडून वारंवार होणारी अवास्तव शुल्कवाढ तसेच सहल, गणवेश, पुस्तक खरेदीमध्ये नानाविध प्रकारे पैसे वसूल करण्यात येत असल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील प्रकार रोखण्याबाबत शासनाने खासगी विनाअनुदानित आणि कायम विनाअनुदानित शाळांमध्ये पालक-शिक्षक संघ स्थापन करण्याचे बंधन घातले मात्र प्रत्यक्षात शहरातील अनेक शाळांमध्ये अशी समितीच नसल्याची माहिती निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने विद्यार्थी पालकांच्या समस्या लक्षात घेऊन त्या सोडविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करणार आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१७-१०-२०१८) :** (१) काही खाजगी शाळांकडून करण्यात आलेल्या शुल्कवाढी संदर्भात तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.

(२) नाही.
(३) व (४) महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियमन, २०११ मध्ये सुधारणेबाबत कार्यवाही सुरु आहे.

---

**खिंडीचीवाडी, मौजे. खोर तसेच (ता.दौंड, जि.पुणे) येथील जिल्हा परिषद शाळा इमारती धोकादायक असल्याबाबत**

**(७) ६४२७९ (२२-०९-२०१६). श्री.राहूल कुल (दौंड), श्री.महेश (दादा) लांडगे (भोसरी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खिंडीचीवाडी, मौजे खोर (ता.दौंड, जि.पुणे) येथील जिल्हापरिषद शाळेच्या इमारती जुन्या व जीर्ण झाल्या असल्याने विद्यार्थ्यांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दौंड तालुक्यातील जुन्या व जीर्ण झालेल्या जिल्हापरिषद शाळेच्या इमारतींच्या दुरुस्ती बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१२-१०-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.
खिंडीचीवाडी येथील शाळेसह दौंड तालुक्यातील ४५ शाळांना दुरूस्तीची आवश्यकता आहे.
(२) सर्व शिक्षा अभियान, जिल्हा नियोजन समिती तसेच जिल्हा परिषदेच्या माध्यमातून जुन्या व जीर्ण शाळांच्या दुरूस्तीची तजवीज ठेवण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पनवेल तालुक्यातील शाळांची पटसंख्या वाढविण्याबाबत**

**(८) ६६१३५ (२७-०१-२०१७). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर)** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पनवेल (जि.रायगड) तालुक्यातील एकूण ४६ शाळा २० पटसंख्ये पेक्षा कमी असल्याचे तसेच ६ शाळा बंद होणार असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सर्व शिक्षा अभियांतर्गत प्रत्येक मुलाला शिक्षण मिळण्याच्या दृष्टीने शाळेची पटसंख्या वाढविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१०-१०-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे, पनवेल तालुक्यातील ४७ शाळांचा पट २० पेक्षा कमी असल्याचे आढळून आले आहे. त्यापैकी कोंद्याचीवाडी, चिंचवाडी, खंगारपाडा, वाघ्राचीवाडी व चाफेवाडी या ५ शाळांमध्ये ५ पेक्षा कमी पटसंख्या होती. या शाळेतील पालकांनी त्यांच्या स्वत:च्या सोयीसाठी आश्रमशाळा व सोयीच्या शाळांमध्ये विद्यार्थी दाखल केले आहेत. त्यामुळे या शाळांचा पट शुन्य झाल्याने शाळा बंद झालेल्या आहेत.
(२) प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम प्रभावीपणे राबविला जात असून प्रत्येक मूल "प्रगत" करणेबाबत सुक्ष्म नियोजन केलेले आहे. तसेच १०० टक्के शाळा प्रगत करणेसाठी प्रयत्न केले जात आहे. प्रत्येक शाळेत ज्ञानरचनावादी पद्धतीने अध्ययन अध्यापन केले जात आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोकतपूर (ता.जि.अमरावती) येथील जिल्हा परिषदेच्या पूर्व माध्यमिक शाळेच्या नविन वर्ग खोल्या व क्रिडांगणाच्या बांधकामाबाबत**

**(९) ६७९८० (२७-०१-२०१७). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोकतपूर (ता.जि.अमरावती) येथील जिल्हा परिषदेच्या पूर्व माध्यमिक शाळेच्या नविन वर्ग खोल्यांना व विद्यार्थ्यांना खेळण्याकरीता क्रिडांगण मंजूर झाले असून सदर वर्ग खोल्या व क्रिडांगण प्रस्ताव स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ११ जुलै, २०१६ रोजी वा त्या सुमारास जिल्हाधिकारी व संबधित विभागाकडे सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने प्रस्तावास मंजूरी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२३-१०-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) प्राथमिक शाळेच्या उपलब्ध जागेत दुमजली इमारतीचे बांधकाम करण्यात येत आहे. क्रिडांगणासाठी जागा उपलब्ध करून देण्याची कार्यवाही महसूल विभागामार्फत करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अमरावती जिल्हयातील शाळांमध्ये मुलींसाठी सोयिसुविधा उपलब्ध करण्याबाबत**

**(१०) ६८०२६ (२७-०१-२०१७). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयात पहिली ते बारावी पर्यंतच्या २७६४ शाळांपैकी अनेक शाळांमध्ये मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह, खेळाचे मैदाने, किचन शेड तसेच प्राथमिक शिक्षण देणा-या शाळांमध्ये अतिरिक्त वर्गखोल्याचे बांधकाम, वर्गखोल्यांची दुरुस्ती, किचन शेड, संरक्षण भिंत, इत्यादी कामे सन २०१४-१५ पर्यंत पुर्ण करण्याचे नियोजन असूनही अनेक शाळांमध्ये सदर काम प्रलंबित असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अमरावती जिल्हयात शाळांच्या दुरुस्तीसाठी कोट्यवधीचा निधी देऊनही शाळा दुरुस्तीच्या प्रतिक्षेत आहेत त्यामुळे विद्यार्थ्यांची गैरसोय होत असल्याने अनेक पालकांना खाजगी शाळांमध्ये जावे लागत असल्याने जिल्हा परिषदेच्या शाळांची पटसंख्या घटत असल्याने याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२३-१०-२०१८) :** (१) हे खरे नाही.

अमरावती जिल्हयात २८९७ शाळा असून त्यांपैकी २८७१ शाळांत मुलींसाठी स्वच्छतागृह, २३३८ शाळांत क्रिडांगण, २१५१ शाळांत किचनशेड व २५७६ शाळांत संरक्षण कुंपण उपलब्ध आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**प्रशांत नगरातील (जि.अमरावती) जॅक ॲण्ड जिल स्कूलच्या आवारात आरागीरणीची लाकडे साठवून ठेवण्यात आल्याबाबत**

**(११) ६८४६४ (२७-०१-२०१७). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रशांत नगरातील (जि.अमरावती) जॅक ॲण्ड जिल स्कूलच्या आवारात आरागीरणीची लाकडे साठवून ठेवण्यात आल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ही लाकडे विद्यार्थ्यांसाठी धोकादायक असल्याने याबाबत संस्था चालक व वन विभागाने कोणतीच कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन विद्यार्थ्यांसाठी धोकादायक असलेली उपरोक्त शाळेच्या आवारातील लाकडे हटविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२३-१०-२०१८) :** (१) होय.

(२) व (३) संदर्भीय जॅक ॲण्ड जिल शाळेस विस्तार अधिकाऱ्याने दिनांक १८/११/२०१६ रोजी भेट दिली होती. शाळेतील लाकडे उचलण्यात आली असून शाळा व संस्थेला सक्त ताकीद देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कल्याण पूर्व येथील सेंट मेरी शाळेने विदर्यार्थींना आर.टी.ई. अंतर्गत प्रवेश नाकारल्याबाबत**

**(१२) ६९६०४ (२७-०१-२०१७). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण येथील शाळेमध्ये शासनाच्या बालकांच्या मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिनियम २००९ अंतर्गत पालकांनी २५ टक्के राखीव असलेल्या जागेसाठी ऑनलाईन अर्ज भरले असताना प्रवेशपत्र मिळल्यानंतरही सेंट मेरी शाळेने ४२ विदर्यार्थींना आर.टी.ई. अंतर्गत प्रवेश नाकारुन शासकीय नियमांचे उल्लंघन केल्याचे दिनांक ४ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने शासकीय नियमांची पायमल्ली करणाऱ्या सेंट मेरी शाळेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०३-१०-२०१८) : (**१) अंशत: खरे आहे.

(२) सन २०१६ ते २०१९ या कालावधीचे पुनर्मान्यता आदेश निर्गमित करण्यात आलेले नाहीत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सारोळे (ता.मोहोळ, जि.सोलापूर) येथील आयएसओ सोलापूर मानांकन मिळालेल्या जिल्हा परिषदेच्या शाळा इमारतीच्या बांधकामाबाबत**

**(१३) ६९९९१ (२७-०१-२०१७). श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सारोळे (ता.मोहोळ, जि.सोलापूर) येथील आयएसओ मानांकन मिळालेल्या जिल्हा परिषदेच्या शाळेची इमारत अत्यंत धोकादायक असून येथील विद्यार्थ्यांना जीव मुठीत घेवून शिक्षण घ्यावे लागत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तालुक्यातील सहा शाळांच्या इमारती धोकादायक असल्याबाबत जिल्हा स्तरावर प्रस्ताव पाठविण्यात आले आहेत हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने या प्रस्तावांना मंजूरी देवून सदर शाळा पाडून तेथे नवीन बांधकाम करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२३-१०-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.
सारोळे येथील जिल्हा परिषद शाळेतील ५ वर्ग खोल्या धोकादायक झाल्या आहेत. परंतु धोकादायक वर्गखोल्यात विद्यार्थी बसविले जात नाहीत.
(२) व (३) मोहोळ तालुक्यातील १२ जिल्हा परिषद शाळांतील ४७ वर्गखोल्या जीर्ण झाल्या असून त्यातील ४१ खोल्या निर्लेखित करण्यात आल्या आहेत. तसेच वर्गखोली दुरूस्ती/ बांधकामाची निकड व निधी उपलब्धतेनुसार जिल्हा नियोजन समिती व सर्व शिक्षा अभियानातून बांधकाम/ दुरूस्तीची तजवीज ठेवली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### बामणी (ता.हादगाव, जि.नांदेड) येथील जिल्हा परिषदेच्या शाळेतील गैरसोईबाबत

**(१४) ७०३७१ (२७-०१-२०१७). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बामणी (ता.हादगाव, जि.नांदेड) येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील ५ वर्ग खोल्यांपैकी एकाही खोलीला छत नसून सदर बांधकाम जीर्ण झाले असून, भिंतीना तडे तसेच छत गळती असूनही सर्व शिक्षा अभियानाची एकही वर्गखोली या शाळेला देण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात शालेय व्यवस्थापन समिती व गावकऱ्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, गट शिक्षण अधिकारी यांच्याकडे अनेकवेळा तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने उपरोक्त शाळेला सुखसोयी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२३-१०-२०१८) :**(१) अंशत: खरे आहे.
सर्व शिक्षा अभियानांतर्गत बामणी जिल्हा परिषद शाळेत एक वर्ग खोली बांधण्यात आली आहे. शाळेतील चार वर्गखोल्या जीर्ण झाल्या आहेत.
(२) होय
(३) वर्गखोली दुरूस्ती/ बांधकामाची निकड व निधी उपलब्धतेनुसार जिल्हा नियोजन समिती व सर्व शिक्षा अभियानातून बांधकाम/ दुरूस्तीची तजवीज ठेवली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नाशिक जिल्हयातील ८९ शाळा खोल्याचे नव्याने बांधकाम करण्याबाबत**

**(१५) ७०८२२ (२७-०१-२०१७). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयातील ८९ शाळा खोल्या या धोकादायक स्थितीत असल्याचे निदर्शनास आले असून त्या जागी नविन खोल्या बांधण्याची आवश्यकता आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्य:स्थितीत उपरोक्त शाळा खोल्यातील संबंधित विद्यार्थी हे समाजमंदिरात तसेच खाजगी जागेत शिक्षण घेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त शाळांना वर्ग खोल्या नव्याने बांधण्यासाठी निधी नसल्याने ही कामे प्रलंबित आहेत हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने उपरोक्त प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२३-१०-२०१८) :** (१) हे खरे नाही.

नाशिक जिल्हयातील ७१५ वर्गखोल्या नादुरूस्त आहेत.

(२) व (३) हे खरे नाही.

(४) जिल्हा नियोजन समितीकडून सन २०१७-१८ करिता प्राप्त ३ कोटी रूपये निधीतून १०६ शाळांच्या वर्गखोल्यांची दुरूस्ती हाती घेण्यात आली आहे. तसेच निधी उपलब्धतेनुसार सर्व शिक्षा अभियान व जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून वर्गखोली दुरूस्ती व बांधकामाची तजवीज ठेवली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात मराठा शाळेपासून किमान ५ कि.मी. परिसरात नवीन इंग्रजी माध्यमाच्या शाळांना परवानगी न देण्याबाबत**

**(१६) ७२११९ (२७-०१-२०१७). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मराठी शाळेपासून किमान ५ कि.मी. परिसरात नवीन इंग्रजी माध्यमाच्या शाळांना परवानगी देऊ नये असा शासन निर्णय असून या शासन निर्णयाचे उल्लंघन होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने सर्व्हेक्षण करुन मराठी शाळांच्या ५ किमी परिसरातील इंग्रजी शाळांना दिलेली परवानगी रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२३-१०-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**यवतमाळ येथील जिल्हा क्रिडा कार्यालया अंतर्गत शालेय क्रिडा स्पर्धेच्या निधीचा अपहार झाल्याबाबत**

**(१७) ७३०४८ (२७-०१-२०१७). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ येथील जिल्हा क्रिडा कार्यालयाने सन २०१५ -१६ च्या शालेय क्रिडा स्पर्धेदरम्यान अनियमतता व आर्थिक गैरव्यवहार केल्याचे दिनांक १२ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने सदर प्रकरणी आर्थिक नुकसानीस जबाबदार असलेल्या संबधित अधिका-यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१६-१०-२०१८) :** (१) होय, तथापि यवतमाळ जिल्हयात आयोजित करण्यात आलेल्या शालेय क्रीडा स्पर्धेच्या आयोजनामध्ये तसेच निधी विनियोगामध्ये कोणतीही अनियमितता झाली नसल्याची बाब चौकशीअंती शासनाच्या निर्देशनास आली आहे.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मानेवाडी (ता.राधानगरी, जि.कोल्हापूर) येथे जिल्हा परिषद शाळेला इमारत नसल्याबाबत**

**(१८) ७८२४७ (२०-०४-२०१७). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानेवाडी (ता.राधानगरी, जि.कोल्हापूर) येथे इयत्ता पहिली ते सातवी पर्यंत जिल्हा परिषद शाळा आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शाळेला खोल्या नसल्याने शाळेचे वर्ग उघड्यावर भरत असून विद्यार्थ्यांच्या शालेय भवितव्यास धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास शासनाने राधानगरी तालुक्यातील (जि.कोल्हापूर) मानेवाडी येथे जिल्हा परिषद शाळेची इमारत बांधण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (१२-१०-२०१८) :** (१) होय.
(२) हे खरे नाही.

(३) सर्व शिक्षा अभियानात मंजूर करण्यात आलेल्या वर्गखोलीचे बांधकाम सुरू असून जिल्हा नियोजन समितीकडून दुसरी वर्गखोली उपलब्ध करण्याची तजवीज ठेवली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मोखाडा (जि.पालघर) तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांच्या दुरवस्थेबाबत**

**(१९) ७८३४० (२०-०४-२०१७). श्री.अमित घोडा (पालघर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोखाडा (जि.पालघर) तालुक्यात १५८ जिल्हा परिषदेच्या शाळा असून बेहरवाडी, बिवळपाडा, राऊतपाडा, खोच, धोंडमर्याचीमेट अशा एकूण ४० पेक्षा अधिक जिल्हा परिषद शाळांच्या इमारती धोकादायक स्थितीत आहेत, हे खरे आहे काय,
(२) तसेच, उपरोक्त शाळांचे सर्वेक्षण अहवाल जिल्हा परिषद विभाग, मोखाडा यांनी मागविले असून उक्त अहवाल अद्याप प्राप्त झालेला नाही तसेच अपघाताच्या घटना टाळण्यासाठी या इमारतीचे तात्काळ नविन बांधकाम व दुरुस्ती करण्याबाबत स्थानिक नागरिकांने सन २०१३ पासून मुख्य कार्यकारी अधिकारी, मोखाडा यांना निवेदने देऊनही कोणतीच कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार शाळेच्या इमारतीची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१२-१०-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.
बेहरवाडी व खोच येथील एक-एक इमारत धोकादायक आहे. तसेच तालुक्यातील ४० शाळांतील ५३ वर्गखोल्यांना मोठया दुरूस्तीची आवश्यकता आहे.
(२) मोखाडा तालुक्यातील सर्व शाळांचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याची कार्यवाही मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या आदेशांनुसार चालू आहे.
(३) सर्व शिक्षा अभियान, जिल्हा नियोजन समिती इत्यादी माध्यमांतून शाळांच्या दुरूस्तीची तजवीज ठेवली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वांद्रे (मुंबई) येथील अन्न व औषधे प्रशासन कार्यालयाच्या सुशोभिकरणाच्या चौकशीबाबत**

**(२०) ७९४३३ (२०-०४-२०१७). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वांद्रे (मुंबई) येथील अन्न व औषधे प्रशासन कार्यालयाच्या इमारतीचे सुशोभिकरणाचे काम खाजगी निधीतुन झाल्या प्रकरणी चौकशी पूर्ण झाली आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी केलेल्या चौकशीत काय आढळून आले व खाजगीरीत्या सुशोभिकरण करणा-या संबधित अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०५-०९-२०१८) :** (१) होय.
(२) व (३) होय चौकशीत संबधितांनी किरकोळ स्वरुपाचे पडदे बदलणे, रंगकाम इ. कामे केल्याचे आढळले असून दखल घेण्याजोगी बाब नसल्याने कार्यवाहीचा प्रश्न उद्भ्वत नाही.

---

## सिंधदुर्ग जिल्हयाचे प्रारूप किनारा क्षेत्र व्यवस्थापन आराखड्यांच्या संदर्भातील हरकतींबाबत

**(२१) ९६३१४ (३०-१२-२०१७). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंधदुर्ग जिल्हयाचे सी. आर. झेड. अधिसूचना २०११ अंतर्गत प्रारूप किनारा क्षेत्र व्यवस्थापन आराखडे बनविण्याचे काम सेस मार्फत पूर्ण झालेले असल्याने सदर आराखडा प्रसिद्ध करून नागरिकांकडून हरकती मागविणे आवश्यक असताना माहे नोव्हेंबर, २०१७ पर्यंत जिल्हयातील किती नागरिकांच्या हरकती प्राप्त झाल्या आहेत,
(२) असल्यास, उक्त हरकतींची दखल घेऊन शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. रामदास कदम (२६-०९-२०१८) :** (१) सी.आर.झेड अधिसूचना, २०११ नुसार सिंधदुर्ग जिल्हयाचे प्रारूप किनारा क्षेत्र व्यवस्थापन आराखडे बनविण्याचे काम केद्रिय पर्यावरण, वने व वातावरणीय बदल, नवी दिल्ली यांनी प्राधिकृत केलेल्या सेस, केरळ या संस्थेने पूर्ण केलेले आहेत. त्यानुसार जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांनी दिनांक २१/०८/२०१७ रोजी नागरीकांच्या हरकती व सूचना मागविण्यात आल्या. त्यावर जिल्हयाधिका-याच्या अध्यक्षतेखाली दिनांक ११/१०/२०१७ रोजी जनसुनावणी घेण्यात आली. प्रारुप आराखडयानुसार सार्वजनिक स्वरुपाच्या ३७ व वैयक्तिक स्वरुपाच्या ४८ अशा एकूण ८५ हरकती व सूचना प्राप्त झालेल्या आहेत.
(२) प्रारुप आराखडयांवर नागरिकांकडून प्राप्त झालेल्या एकूण ८५ हरकती व सूचना पुढील कार्यवाहीसाठी सेस केरळ या संस्थेकडे दिनांक १५/०१/२०१८ रोजी पाठविण्यात आल्या असून अंतिम आराखडे प्राप्त झाल्यानंतर त्यास शासनाची मान्यता घेऊन केंद्रिय पर्यावरण, वने व वातावरणीय बदल, नवी दिल्ली यांचेकडे मंजुरीसाठी पाठविण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अहमदनगर जिल्ह्यातील दूध प्रक्रिया केंद्रात भेसळ होत असल्याबाबत**

**(२२) ९७४५६ (०६-०१-२०१८). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्ह्यातील दूध प्रक्रिया केंद्रात भेसळ होत असल्याच्या प्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी छापा टाकला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या छाप्यात कोणकोणत्या वस्तू हस्तगत करण्यात आल्या आहेत,

(३) असल्यास, या प्रकरणी आतापर्यंत किती जणांवर कोणत्या कलमान्वये कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच या प्रकरणाची सद्यःस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२९-०९-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) दि.१३/०९/२०१७ रोजी अन्न व औषध प्रशासनाने व स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी यांचे समवेत मे.श्री भवानी दुध प्रोसेसिंग प्रा.लि., जि.अहमदनगर या पेढीची तपासणी करुन अन्न सुरक्षा अधिकारी यांनी सदर पेढीतून २ गायीचे दुधाचे नमुने व ५ भेसळकारक पदार्थ Instant Tea Coffee Dried Powder, Caustic Soda Flakes, Unknown White Powder, Unknown liquid chemical या भेसळकारी पदार्थांचा साठा जप्त करण्यात आला आहे.

दि.१४.०९.२०१७ रोजी मे. अण्णासिंधु या पेढीमधुन १ गाईच्या दुधाचा नमुना व Potassium Hydroxide Flakes (Costic Potash) हा भेसळकारक पदार्थ जप्त करण्यात आला आहे.

(३) गाईच्या दुधाच्या दोन कमी दर्जाच्या नमुन्याप्रकरणी मे.श्री भवानी दुध प्रोसेसिंग प्रा.लि., जि.अहमदनगर या पेढीच्या दोन संचालकाविरुध्द व पेढीविरुध्द अन्न सुरक्षा व मानके कायद्यांतर्गत दोन न्यायनिर्णय प्रकरणे दाखल केली आहेत. तसेच भेसळकारी पदार्थ आढळून आल्याने ३ न्यायनिर्णय प्रकरणे दाखल केली असुन न्यायनिर्णयासाठी प्रलंबित आहेत.

मे.अण्णासिंधु मिल्क ॲण्ड मिल्क प्रॉडक्ट, या पेढीचे मालकाविरुध्द अन्न सुरक्षा व मानके कायद्यांतर्गत १ दुधाच्या नमुन्या प्रकरणी तसचे १ भेसळकारी पदार्थ आढळुन आल्याने न्यायनिर्णय प्रकरण दाखल केले असून न्यायनिर्णयासाठी प्रलंबित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अंबरनाथ (जि.ठाणे) औद्योगिक वसाहतीमधील कंपन्यांवर केलेल्या कारवाईबाबत**

**(२३) १०१२७२ (३०-१२-२०१७). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ (जि.ठाणे) औद्योगिक वसाहतीमधील सी.ई.टी.पी.प्लांट गत वर्षभरापासून बंद असल्याने औद्योगिक वसाहतीतील अनेक कंपन्यामधून रसायन मिश्रित पाण्यावर प्रक्रिया न करताच हे पाणी बाहेर सोडल्याने तसेच धरण क्षेत्रात रसायन टाकण्यात आल्यामुळे

एम.पी.सी.बी.ने याची गंभीर दखल घेत औद्योगिक वसाहतीतील तब्बल १२ कंपन्यांना कंपनी बंद करण्याच्या नोटीसा माहे जुलै, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान पाठविल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू १२ कंपन्या कोणत्या आहेत व त्यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (२८-०९-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) अतिरिक्त अंबरनाथ औदयोगिक वसाहतीमध्ये सांडपाणी निर्माण करणा-या सर्व उदयोगांचे सांडपाणी हे प्रक्रिया केल्यानंतर पुर्नवापर करण्यात येते तसेच काही उदयोगांनी शुन्य निष्कासन पध्दत (ZLD)अवलंबलेली आहे. परंतु एप्रिल, मे व जून, २०१७ मध्ये करण्यात आलेल्या पाहणीमध्ये प्रक्रिया केलेले सांडपाणी बागकामाकरीता वापरत असल्याचे निदर्शनास आल्यामुळे सदर १२ उदयोगांना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे जुलै, २०१७ मध्ये कारखाने बंद करण्याच्या नोटीस देण्यात आलेल्या आहेत.

तसेच चिखलोली धरण क्षेत्रामध्ये घातक घनकचरा टाकल्याचे आढळून आल्यामुळे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने ७ उदयोगांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेल्या होत्या. त्यापैकी ३ उदयोगांना प्रस्तावित आदेश तसेच ४ उदयोगांना उत्पादन बंदचे आदेश देण्यात आलेले आहेत.तसेच अतिरिक्त अंबरनाथ येथील सामुयिक सांडपाणी प्रक्रिया केंद्र (सी.ई.टी.पी.) मा.हरित लवाद, पुणे यांच्या आदेशान्वये बंद करण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## आदिनाथ व मकाई साखर कारखान्यातील (ता.करमाळा, जि.सोलापूर) सभासदांना जुनी साखर वाटप केल्याबाबत

**(२४) १०१५९५ (०६-०१-२०१८). श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिनाथ व मकाई साखर कारखान्याने (ता.करमाळा, जि.सोलापूर) सन २०१७ च्या दिवाळी सणानिमित्ताने कारखान्यांच्या सभासदांसाठी सन २००५-०६ मध्ये लालसर, काळपट व मुंग्या असलेली साखर करमाळा तालुक्यातील बालेवाडी येथील साखर वाटप केंद्रात दिनांक १२ ऑक्टाबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास वाटप केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जुनी साखर वाटप करणे बेकायदेशीर असल्यामुळे कारखान्यांच्या सभासदांनी जिल्हा अन्न व औषध प्रशासन अधिकारी यांच्याकडे तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अन्न व औषध प्रशासनाने सदर साखरेचे नमूने घेऊन प्रयोग शाळेत तपासणीसाठी पाठविल्याचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,

(४) असल्यास, सदर अहवालाच्या अनुषंगाने शासनाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१४-०९-२०१८) : (**१) हे खरे नाही. तथापि, दि.१३/१०/२०१७ रोजी दै.सकाळ या वृत्तपत्रामध्ये अशा आशयाची बातमी प्रसिध्द झालेली होती.

(२) हे खरे नाही.

अन्न व औषध प्रशासनास अशा प्रकारची तक्रार प्राप्त झालेली नाही.

(३) व (४) सदर बातमीच्या अनुषंगाने अन्न व औषध प्रशासनाने मे. आदिनाथ साखर कारखाना, ता.करमाळा, जि.सोलापूर येथे भेट देऊन साखरेचे नमुने तपासणी घेण्यात आले होते. सदर नमुन्यांचा अहवाल प्राप्त झाल असून सदर साखरेचा अन्न नमुना साखरेसाठी असलेल्या २.८.१ मानदानुसार आहे. मात्र सदर नमुना लेबल दोषयुक्त असल्याचे अन्न विश्लेषकांनी घोषित केले आहे.

सदर लेबल दोषाबाबत न्यायनिर्णय अधिकारी, पुणे यांच्याकडे दंडात्मक कारवाईकरीता न्यायनिर्णय प्रकरण दि.२५/०१/२०१८ रोजी दाखल करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**परळ (मुंबई) येथे असलेल्या हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळातील रोजंदारी तत्वावरील कामगारांना कायम करण्याबाबत**

**(२५) १०४८२० (०७-०४-२०१८). श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परळ (मुंबई) येथे असलेल्या हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळात सन १९९५ पासून रोजंदारीवर काम करणा-या ४२ कर्मचा-यांना व्यवस्थापनाने कायम केले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ४२ कामगारांच्या बाजूने न्यायालयाने निकाल देऊनही कर्मचाऱ्यांना कायमस्वरुपी कामावर न घेतल्याने कामगारांनी याबाबत मा.मुख्यमंत्री तसेच मा.अन्न व औषध प्रशासन मंत्री यांच्याकडे वारंवार मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रोजंदारी कामगारांबाबत हाफकिनच्या जगदीश कुलकर्णी आणि शंकर वार यांनी खोटी माहिती मा.मुख्यमंत्री व मा.अन्न व औषध प्रशासन मंत्री यांना दिल्याने मा.अन्न व औषध प्रशासन मंत्री यांनी याबाबतची सन २०११ ची कोर्टाची ऑर्डर कॉपी घेऊन संबंधित अधिका-यांना उपस्थित राहण्याचे निदेश दिल्यानंतरही संबंधित अधिका-यांनी कोणतीच निर्णयात्मक कार्यवाही केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळात १९९५ पासून रोजंदारीवर काम करणा-या कामगारांना कायम स्वरुपी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०१-१०-२०१८) :** (१) होय.

(२) मा.औद्योगीक न्यायालयाने दिलेला निकाल हा कामगारांच्या बाजूचा नाही. कारण न्यायालयाने दि.२४/०८/२०११ च्या आदेशात स्पष्ट नमूद केले आहे की, महामंडळात ज्यावेळेस रोजंदारी तत्वावरील काम उपलब्ध होईल त्यावेळेसच केवळ रोजंदारी कर्मचाऱ्यांच्या जेष्ठता यादीप्रमाणे चक्राकार पध्दतीने त्यांना काम देण्यात यावे. परंतु रोजंदारी कर्मचारी सातत्याने कायमस्वरुपी कामावर घेण्याची मागणी करत आहेत.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अरळगुंडी (ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर) येथील नागरीकांना गाळ मिश्रीत पाण्याचा पुरवठा होत असल्याबाबत**

**(२६) १०७३३७ (१४-०४-२०१८). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अरळगुंडी (ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर) या गावास गाळ मिश्रीत पाणीपुरवठा होत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार अरळगुंडी गावातील नागरीकांना स्वच्छ, शुध्द व पुरेसे पाणी मिळावे म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०९-१०-२०१८) :** (१) होय.

(२) अरळगुंडी गावासाठी सन १९८६-८७ मध्ये गावठाना लगत हिरण्यकेशी नदीकाठी विहिर घेऊन नळ पाणी पुरवठा योजना राबविण्यात आली आहे. हिरण्यकेशी नदीवर चित्री मध्यम प्रकल्प उभारण्यात आल्याने या योजनेस जानेवारी नंतर पाणी कमी पडत असल्याने सन २०१०-११ मध्ये ५ कि.मी. अंतरावरील खणदाळ बंधा-यावरुन नवीन योजना सुरु करण्यात आली आहे.

दोन्ही योजना ग्रामपंचायतीच्या ताब्यात आहेत. खणदाळ बंधा-यावरील योजनेचे अंतर जास्त असल्याने लाईट बिल दुप्पट येत असल्याने हिरण्यकेशी नदीवरील जुनी योजनाही ऑगस्ट ते डिसेंबर या कालावधीत ग्रामपंचायतीमार्फत चालवण्यात येते. जुन्या योजनेत नदी पात्रातील पाणी कमी झाल्याने जॅकवेलमध्ये येणा-या पाण्याबरोबर ट्रेंच गॅलरीद्वारे गाळ आल्याचे आढळले. याबाबत त्वरीत कार्यवाही करुन नवीन खणदाळ बंधा-यावरील योजनेतून गावास शुध्द व पुरेसा पाण्याचा पुरवठा सुरु करण्यात आला व आताही होत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात नियमांची अंमलबजावणी न करणा-या रक्तपेढयांचे परवाने रद्द केल्याबाबत**

**(२७) १०७८२९ (१४-०४-२०१८). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.अनिल कदम (निफाड), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात नियमांची अंमलबजावणी न करणा-या १२ रक्तपेढयांचे परवाने अन्न व औषध प्रशासनाने रद्द केले असून एका रक्तपेढीचा परवाना माहे एप्रिल ते ऑक्टोबर, २०१७ मध्ये तसेच नागपूर शहरातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासह पाच रक्तपेढयांचे परवाने निलंबित केल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त रक्तपेढया कोणकोणत्या आहेत तसेच अनेक रक्तपेढयांमध्ये तंत्रज्ञ व जबाबदार अधिकारीही नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार रक्तपेढयांकरिता असणा-या नियमांची अंमलबजावणी होणे तसेच नियमांचे उल्लंघन करणा-या रक्तपेढ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच बेजबाबदार रक्तपेढयांना प्रतिबंध घालण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०४-०८-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.

अन्न व औषध प्रशासनाने माहे एप्रिल, ते ऑक्टोबर, २०१७ या कालावधीत एकूण १४ रक्तपेढ्यांवर कारवाई केली असून एका रक्तपेढीचा परवाना रद्द व १३ रक्तपेढ्यांचे परवाने निलंबित करण्यात आले आहेत.

नागपूर शहरातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासह पाच रक्तपेढयांचे परवाने निलंबित केल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आलेली नाही. मात्र ऑक्टोबर, २०१५ ते मार्च २०१६ या कालावधीत नागपूर येथील ५ रक्तपेढ्यांचे परवाने निलंबित करण्यात आले असून त्यात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर मधील रक्तपेढीचा समावेश आहे.

(२) उपरोक्त रक्तपेढ्यांमध्ये तंत्रज्ञ व जबाबदार अधिकारी नसल्याचे अन्न व औषध प्रशासनाच्या निदर्शनास आलेले नाही.

एप्रिल ते ऑक्टोबर २०१७ मध्ये कारवाई केलेल्या रक्तपेढ्यांची नावे खालीलप्रमाणे आहेत.

अ) १ रद्द रक्तपेढी

१. मे.एम.बी.मोरे फाऊंडेशन, कै.डी.जी. तटकरे ब्लड बँक, जि.रायगड

ब) १३ परवाने निलंबित रक्तपेढ्या

१ मे.नवी मुंबई ब्लड बँक, जि.रायगड

२ पद्मश्री डॉ.डी.वाय.पाटील हॉस्पीटल ब्लड बँक, जि.ठाणे

३ मे. मल्लिकार्जुन चॅरिटेबल संस्था, मलिकार्जुन रक्तपेढी, सोलापूर

४ मे. सिध्देश्वर रक्तपेढी, सोलापूर

५ मे.अक्षय रक्तपेढी, सोलापूर

६ मे.अतहर रक्तपेढी, सोलापूर

७ मे.के.एन.गुजर रक्तपेढी, सातारा

८ राजश्री शाहू रक्तपेढी, कोल्हापूर

९ यशोदर्शन सामाजिक विकास मंडळ संचलित अर्पण रक्तपेढी, कोल्हापूर

१० मे.इंडियन सिरॉलाजीकल इन्स्टिट्युट रक्तपेढी, पुणे.

११ पुणे चेस्ट हॉस्पीटल रक्तपेढी, पुणे.

१२ मे.के.ई.एम. हॉस्पिटल रक्तपेढी, पुणे.

१३ मे. पल्लवी ब्लड बँक, पंडित मदन मालवीया शताब्दी हॉस्पीटल, मुंबई.

क) एप्रिल, २०१५ ते मार्च २०१६ दरम्यान नागपूर येथिल रक्तपेढ्यांविरुध्द कारवाई केली त्यांचा तपशील

१ लाईफलाईन ब्लडबँक,नागपूर

२ लता मंगेशकर हॉस्पिटल ब्लड बँक, नागपूर

३ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय नागपूर

४ आयुष ब्लडबँक, नागपूर

५ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल ब्लड बॅक, नागपूर

(३) अन्न व औषध प्रशासनाने माहे एप्रिल, ते ऑक्टोबर, २०१७ या कालावधीत एकूण १४ रक्तपेढ्यांवर कारवाई केली असून एका रक्तपेढीचा परवाना रद्य व १३ रक्तपेढ्यांचे परवाने निलंबित करण्यात आले आहेत. तसेच ऑक्टोबर, २०१५ ते मार्च २०१६ या कालावधीत नागपूर येथील ५ रक्तपेढ्यांवर कारवाई करुन परवाने निलंबित करण्यात आहेत.

(४) अन्न व औषध प्रशासनामार्फत रक्तपेढ्यांच्या नियमीत तपासण्या करण्यात येत असून दोषींवर योग्य ती कारवाई करण्यात येते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील किरकोळ विक्रेत्यांना अन्न व औषध विभागाचा परवाना मिळण्याबाबत**

**(२८) १०८३१५ (१७-०४-२०१८). श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात फळवाले, भाजीवाले, मासे, अंडीवाल्यांसारख्या किरकोळ विक्रेत्यांना अन्न व औषध विभागाच्या परवान्याशिवाय या वस्तू विकता येणार नसल्याचे परिपत्रक अन्न-औषध प्रशासनाने काढले असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जे किरकोळ विक्रेते असा परवाना घेणार नाहीत त्यांच्यावर गुन्हा दाखल करुन सहा महिन्याची शिक्षा आणि रूपये ५ लाखांचा दंड होऊ शकतो, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर किरकोळ विक्रेत्यांना अन्न परवाना मिळण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१३-०७-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) अन्न परवाना व नोंदणीसाठी ऑनलाईन प्रणाली आहे. शुल्क सुध्दा ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येते. त्यामुळे परवाना / नोंदणी प्रमाणपत्र सहजरित्या प्राप्त करण्यास मदत होत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उमरगा (जि.उस्मानाबाद) तालुक्यातील लाभार्थ्यांना वैयक्तिक शौचालय बांधकामाचे अनुदान मिळण्याबाबत

**(२९) ११०८३७ (१९-०४-२०१८). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात स्वच्छ भारत मिशन अंतर्गत ग्रामीण भागातील वैयक्तिक स्वच्छतागृह बांधकामासाठी शासनाकडून प्रत्येकी १२ हजार रुपयांचे अनुदान दिले जात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उमरगा (जि.उस्मानाबाद) तालुक्यातील १ हजार १६९ स्वच्छतागृहांच्या अनुदानाकरिता १ कोटी ४० लाख २८ हजार रुपयांची मागणी करूनही संबंधित लाभार्थ्यांना रक्कम अद्यापही प्राप्त झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार उक्त तालुक्यातील लाभार्थ्यांना तातडीने अनुदान मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०६-१०-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

स्वच्छ भारत मिशन अंतर्गत ग्रामीण भागातील पात्र लाभार्थ्यास वैयक्तिक शौचालय बांधकाम पूर्ण करण्यात येऊन तपासणीअंती प्रत्येकी रुपये १२०००/- इतकी प्रोत्साहनपर रक्कम दिली जाते.

(२) हे खरे नाही.

उमरगा तालुक्यातील १ हजार १६९ वैयक्तिक शौचालयांसाठी रुपये १ कोटी ४० लाख २८ हजार रुपये इतकी प्रोत्साहनपर रक्कम संबंधित लाभार्थ्यांच्या खात्यावर वर्ग करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लातूर जिल्हा परिषदेच्या सर्व शाळा व पाणीपुरवठा योजना सौर ऊर्जेत समाविष्ट करण्याबाबत**

**(३०) १११९८१ (१९-०४-२०१८). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्ह्यातील सर्व शाळा व पाणीपुरवठा योजना सौर ऊर्जेत समाविष्ट करून सर्व पाणीपुरवठा योजना व सर्वच जिल्हा परिषद शाळेत सौर उर्जा प्रकल्प राबविण्याबाबत मा.उर्जा मंत्री महोदयांनी दिनांक २९ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास लातूर येथील आढावा बैठकीत जिल्हापरिषद व महावितरण विभागास निर्देश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच उक्त ठिकाणी किती शाळेत व कोणत्या पाणीपुरवठा योजनांवर सौर ऊर्जा प्रकल्प राबविण्यात आले आहेत व सदर प्रकल्प राबविण्याबाबत किती कालावधी लागणार आहे,

(३) असल्यास, सदर निर्देशाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार उक्त प्रकल्प राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२४-१०-२०१८) : (**१) होय

(२) लातूर जिल्ह्यातील १० तालुक्यामध्ये एकूण २९ जिल्हा परिषद शाळांमध्ये सौर उर्जेवर आधारित दुहेरी पंप योजना राबविण्यात आलेल्या आहेत. तसेच जिल्ह्यातील एकूण ४९ पाणी पुरवठा योजनांवर सौर प्रकल्प राबविण्यात येत आहे. सौर उर्जा प्रकल्प पूर्ण जिल्ह्यात राबविण्याकरिता योजनांच्या मंजुरीनंतर दीड-दोन वर्षाचा कालावधी लागणार आहे.

(३) सदर निर्देशाच्या अनुषंगाने शासनामार्फत महाऊर्जा यांच्या मार्फत प्रकल्प राबविण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयात अन्न व औषध विभागाने भेसळ विरोधात कारवाई केल्याबाबत**

**(३१) १११४९८ (१७-०४-२०१८). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयात अन्न व औषध विभागाने माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान भेसळीबाबत कारवाई केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार उक्त कारवाईमध्ये किती जणांवर कोणत्या कलमान्वये कारवाई करण्यात आली वा येत आहे व किती किंमतीचा माल जप्त करण्यात आला आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१३-०७-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) कोल्हापूर जिल्ह्यात माहे, डिसेंबर २०१७ मध्ये अन्न भेसळी संदर्भात खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आली.

अन्न व औषध प्रशासनाने भेसळीच्या संशयावरुन दि.०६/१२/२०१७ रोजी मे.विरभद्र ऑईल मिल, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर यांच्याकडून शेंगदाणा तेल ७५८.४ कि.ग्रॅ, किंमत रु.८७९७४.४/- व रिफाईड सरकी तेल-२८८.४ कि.ग्रॅ. रु.१९८७२/- असा साठा जप्त केला. त्यामधील शेंगदाणा तेल हे प्रमाणित आढळले आहे. रिफाईंड सरकी तेल हे Iodian Value ८८.७८ व Bellier Test turbidity temperature २२ अंश सेल्सिअस आढळल्याने अप्रमाणित आढळले आहेत.

शेंगदाणा तेल विक्रेत्यास परत केले असून रिफाईंड सरकी तेल प्रकरणी न्यायनिर्णय अधिकारी यांच्याकडे न्यायनिर्णय प्रकरण दाखल करण्यात आले आहे. तसेच जप्त साठा साबण फॅक्टरीस विकून रक्कम शासन खात्यात जमा करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील विद्यार्थी आणि तरुणांना व्यसनापासून रोखण्यासाठी तंबाखुयुक्त पदार्थांच्या विक्रीस घातलेली बंदी**

**(३२) ११३३६० (०७-०४-२०१८). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विद्यार्थी आणि तरुणांना व्यसनापासून रोखण्यासाठी तंबाखू आणि तंबाखुजन्य पदार्थांच्या विक्रीवर परवाना दिलेल्या दुकानांना तंबाखुयुक्त पदार्थांची विक्री करण्यास बंदी घातल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१३-०७-२०१८) :** (१) तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थ व अन्न पदार्थ एकाच ठिकाणाहून / दुकानातून विक्रीसाठी प्रतिबंध घालण्याचे आदेश दि.१५.०१.२०१८ रोजी पारीत करण्यात आले आहेत.
(२) तंबाखूजन्य पदार्थ व अन्न पदार्थ एकत्र विकणारे व्यवसायीक हे किरकोळ स्वरुपाचे व दुर्गम भागामध्ये स्थित असल्याने अन्न व औषध प्रशासनामार्फत सदर आदेशाची जनजागृतीचे व प्रसिध्दी देण्याचे कार्य चालू करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूर शहरात डॉक्टरांच्या चिठ्ठी शिवाय औषधांची विक्री होत असल्याबाबत**

**(३३) ११४३३६ (१५-०४-२०१८). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर शहरातील औषध दुकानाचा परवाना एकाच्या नावे व दुकान चालविणारी व्यक्ती दुसरीच असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अशा औषध दुकानदारांकडे अन्न व औषध प्रशासन विभाग जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कायद्याच्या तरतुदीनुसार प्रत्येक औषध दुकानामध्ये प्रमाणपत्र प्राप्त फार्मासिस्ट असणे बंधनकारक आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, जिल्ह्यातील औषध दुकानांमध्ये फार्मासिस्ट उपस्थित रहात नसून, डॉक्टरांच्या चिठ्ठी शिवाय औषधाची विक्री होत असलेबाबत अन्न व औषध प्रशासनाच्या निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, अशा औषध दुकानदार व्यावसायिकांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१३-०७-२०१८) :** (१) हे खरे नाही. अशी बाब अन्न व औषध प्रशासनाच्या निदर्शनात आली नाही.
(२) हे खरे नाही.
(३) औषध व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० व त्याअंतर्गत नियम १९४५ नियम ६५ (२) व ६५ (३) नुसार डॉक्टरांच्या चिठ्ठीनुसार विकावयाच्या औषधांची विक्री रजिस्टर फार्मासिस्टच्या देखरेखीखाली होणे बंधनकारक आहे. हे खरे आहे.

(४) व (५) अन्न व औषध प्रशासनाने कोल्हापूर येथे माहे एप्रिल २०१७ ते माहे जानेवारी २०१८ पर्यंत जिल्ह्यातील एकूण ३३३ औषध दुकानांच्या तपासण्या केल्या आहेत. यापैकी २१ दुकानांच्या तपासणीमध्ये रजिस्टर्ड फार्मासिस्टच्या गैरहजेरीत, विक्री बिलाशिवाय व डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय औषध विक्री होत असल्याचे निदर्शनास आले आहे.

सदर प्रकरणी उक्त पेढ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावून औषधे व सौंदर्य प्रसाधने कायद्यातील तरतूदीनुसार ५ पेढ्याचे परवाने रद्द व १६ पेढींचे परवाने निलंबित करण्यात आलेले आहेत.

---

**चाकण (ता.खेड,जि.पुणे) शहरात विनापरवाना व भेसळयुक्त खाद्यपदार्थांची विक्री होत असल्याबाबत**

**(३४) ११४७६३ (१७-०४-२०१८). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाकण (ता.खेड, जि.पुणे) शहरात उघडयावर विनापरवाना तसेच भेसळयुक्त खाद्यपदार्थांची विक्री होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण करणाऱ्या अशा विक्रेत्यांवर तात्काळ कारवाई करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १ फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास लेखी तक्रार चाकण नगरपरिषद यांना केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार भेसळयुक्त तसेच विनापरवाना खाद्यपदार्थ विक्री करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१३-०७-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) स्थानिक लोकप्रतिनिधींनी दि.०१/०२/२०१८ रोजीच्या पत्रान्वये चाकण नगर परिषदेकडे तक्रार दाखल केली होती.

(३) स्थानिक लोकप्रतिधींची तक्रार दि.२७/०२/२०१८ रोजी अन्न व औषध प्रशासनास प्राप्त झालेली आहे. त्यानुषंगाने प्रशासनाकडून कारवाई करण्यात येत आहे.

प्रशासनामार्फत चाकण नगरपरिषदेच्या क्षेत्रात माहे एप्रिल, २०१७ पासुन मे, २०१८ पर्यंत एकूण ४३ आस्थापनांच्या तपासण्या करण्यात आल्या आहेत. त्यात दोषी आढळलेल्या १३ आस्थापनांना सुधारणा नोटीसा पाठविण्यात आल्या आहेत व ३ आस्थापनांचे परवाने निलंबित करण्यात आले आहेत. तर ७ प्रकरणी तडजोड अर्ज दाखल होवून त्याद्वारे एकूण रु.१३५००/- दंड आकारण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अमरावती जिल्हयात मनभरी खादयवस्तु निर्मीती कंपनीच्या निकृष्ट दर्जाच्या खादयपदार्थांची विक्री होत असल्याबाबत

**(३५) ११५३४० (१४-०४-२०१८). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील मनभरी खादयवस्तु निर्मीती कंपनीच्या पदार्थांमध्ये मुंगी व केसांचे गुच्छ आढळल्याने तपासणीअंती मनभरीचे पदार्थ खाण्यायोग्य नसल्याचे मत कनिष्ठ वैज्ञानीक अधिकारी जिल्हा आरोग्य प्रयोगशाळेने व्यक्त केल्याचे दिनांक ६ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, सदर दोषी कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१३-०७-२०१८) :** (१) व (२) दि.०८.०९.२०१७ रोजी अन्न व औषध प्रशासनास अशा आशयाची तक्रार प्राप्त झाली होती. तक्रारीच्या अनुषंगाने प्रशासनाने नमुने घेतले असून सदरचे नमूने प्रमाणित आहेत. तसेच त्यामध्ये मुंगी किंवा केसांचे गुच्छ आढळून आलेले नाहीत.

तथापि, तक्रारदाराने स्वत: हून तक्रारीसोबत दिलेले नमूने विश्लेषणास्तव पाठविले असता त्यामध्ये मुंगी व केसाचे गुच्छ असल्याचा अहवाल प्राप्त झाला आहे. मात्र तक्रारदाराने स्वत: दिलेले नमूने कायदेशीरदृष्ट्या वैध नाहीत. सबब, कायदेशीर वैध नसलेल्या नमून्यावर कारवाई करता येत नाही व मनभरी उत्पादकाचे उत्पादन अप्रमाणित (मुंगी व केसाचे गुच्छ) आहेत असे निष्पन्न होत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुण्यातील स्पायसर विद्यापीठाची चौकशी करण्याबाबत

**(३६) ११६६१६ (२३-०७-२०१८). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यातील स्पायसर विद्यापीठाच्या कुलगुरूंची पीएचडी बोगस असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कुलगुरू श्री.नोबल प्रसाद पिल्ले, मुख्य वित्तीय अधिकारी, श्री.रत्नास्वामी जयेम, कला शाखेचे प्रमुख, श्री.चाको पॉल, क्रिएटीव्ह एज्युकेशनल फाऊंडेशनचे संचालक श्री.गोपाल भिकाजी खंदारे यांचा बोगस पीएचडी प्रकरणात समावेश असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (३०-१०-२०१८) : (**१), (२) व (३) अंशत: खरे आहे.

मा. उदयनराजे भोसले, लोकसभा सदस्य यांनी दि.२०/२/२०१८ रोजी मा. राज्यपाल यांना दिलेले निवेदन राज्यपाल कार्यालयाकडून दि.१४/३/२०१८ रोजी शासनास प्राप्त झाले. शासनाने सदर निवेदनाच्या अनुषंगाने चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबत दि.१९/३/२०१८ रोजी संचालक, उच्च शिक्षण संचालनालयातील प्रशासन अधिकारी यांनी समक्ष स्पायसर विद्यापीठात जाऊन कुलगुरु श्री. नोबल प्रसाद पिल्ले, मुख्य वित्तीय अधिकारी श्री. रत्नास्वामी जयेम, कला शाखेचे प्रमुख श्री. चाको पॉल, यांची पी.एच.डी. प्रमाणपत्राची तपासणी केली असता प्रमाणपत्रामध्ये काही त्रुटी आढळून आल्या आहेत, अध्यापकांनी पी.एच.डी. संदर्भात सादर केलेली प्रमाणपत्रे यांची वैधता मानव भारती विद्यापीठ सोलन, हिमाचल प्रदेश व विद्यापीठ अनुज्ञान आयोग नवी दिल्ली यांचेकडून तपासून घेण्याची आवश्यकता वाटते असे संचालकांनी अहवालात नमुद केले आहे. त्या अनुषंगाने पुढील कार्यवाही सुरु आहे. तसेच या प्रकरणात ॲलम कॅरी अलमेडीया यांनी चतु:श्रुगी पोलीस ठाणे, पुणे शहर येथे स्पायसर विद्यापीठातील बोगस पदवी प्रमाणपत्र सादर करणा-या अध्यापक क्रिएटीव्ह एज्युकेशनल फाऊडेशनचे संचालक श्री. गोपाल भिकाजी खंदारे यांच्या विरुध्द गुन्हा रजि. नंबर २१७/२१८ भा.द. वि.क. ४१७,४६५,४६८,४७१, ३४ नुसार गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पुणे पोलीस करीत आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील वक्फ बोर्डाच्या दर्गाह व मशिदींची विविध प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत**

**(३७) ११८६५६ (२०-०७-२०१८). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वक्फ बोर्डामध्ये प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे असलेला अतिरिक्त कार्यभार तसेच वक्फ बोर्डाच्या बैठका न झाल्याने राज्यभरातील दर्गाह व मशिदींची चार हजार प्रकरणे प्रलंबित असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वक्फ बोर्डाची प्रलंबित असलेली प्रकरणे निकाली काढण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०१-११-२०१८) :** (१) नाही. वक्फ मंडळाच्या दि.०८ व ०९ मे, २०१८ व दि.१९/०६/२०१८ रोजी बैठका झालेल्या आहेत. सदर बैठकीमध्ये दिलेल्या मान्यतेनुसार परिपूर्ण असलेल्या सुमारे ११५७ प्रस्तावांना मान्यता देण्यात आलेली आहे.
(२) वक्फ मंडळाकडील प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी शासन स्तरावरुन वेळोवेळी वक्फ मंडळाला निदेश/सूचना देण्यात आलेल्या आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील खाद्य व्यावसायिकांना कागदपत्रांची पडताळणी न करताच परवाने दिल्याबाबत**

**(३८) ११९०८० (२०-०७-२०१८). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अनेक खाद्य व्यवसायिंकाच्या कागदपत्रांची पडताळणी न करताच त्यांना अन्न व औषधी विभागाने परवाने दिले असल्याने महालेखापालांनी (कॅग) आक्षेप घेतला असल्याचे दिनांक ४ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पडताळणी न करताच परवाने देणा-या अन्न व औषधी विभागातील अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०६-१०-२०१८) :**(१) हे खरे आहे.
(२) फुड सेफ्टी अँड स्टँडर्डस ॲथॉरीटी ऑफ इंडीयाच्या संकेतस्थळावर परवाने व नोंदणीसाठी एफएलआरएस ही प्रणाली विकसीत करण्यात आली असून त्याद्वारे संपुर्ण देशातील परवाने व नोंदणी अर्ज स्विकारणे, नोंदणी मंजूर करण्यासाठी त्याचा वापर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच फुड सेफ्टी अँड स्टँडर्डस ॲथॉरीटी ऑफ इंडीयाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने परवाने अर्ज प्राप्त होतात. त्यामध्ये कोणत्या परवान्याकरीता कोणती कागदपत्रे घ्यावीत याबाबत स्पष्ट निर्देश दिलेले आहेत. सदर निर्देशानुसारच अन्न व्यावसायीकांना अन्न परवाने मंजूर करण्यात आले आहेत. यास्तव अधिकाऱ्यांवर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही वा प्रलंबित नाही.
(३) प्रश्न उद्भ्वत नाही.

---

**बुलडाणा जिल्ह्यातील ग्राम स्वच्छता अभियानाच्या बक्षिसाची रक्कम थकीत असल्याबाबत**

**(३९) ११९२३३ (२३-०७-२०१८). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ग्रामीण भागातील स्वच्छता चळवळ गतीमान करण्यासाठी शासनाच्यावतीने संत गाडगेबाब ग्राम स्वच्छता अभियान व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धेचे आयोजन करण्यात येते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अभियानांतर्गत उत्कृष्ट कार्य करणा-या ग्रामपंचायतींना तालुका, जिल्हा, विभाग व राज्य अशा विविध स्तरावर बक्षिसाची रक्कम वितरीत केली जात होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बुलडाणा जिल्हा परिषद अंतर्गत सन २०१४-१५ या वर्षातील बक्षिसाची रक्कम अद्यापही संबंधीत ग्रामपंचायतींना वितरीत करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार सदर बक्षिस पात्र ग्रामपंचायतींना पुरस्काराची रक्कम देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (११-१०-२०१८) :** (१) होय.
(२) होय.
(३) होय.

शासनाच्या पत्र क्रमांक:- संगाग्रा-२०१६ /प्र.क्र.३१/पापु.८, दिनांक ६ फेब्रुवारी, २०१६ अन्वये संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानामध्ये सन २०१४-१५ व २०१५-१६ ची क्षेत्रिय स्तरावर सुरु असलेली प्रक्रिया पत्राच्या दिनांकापासून स्थगित करण्यात आली. तसेच शासनाच्या पत्र क्र.संगाग्रा २०१६/प्र.क्र.३१/पापु-०८, दिनांक ११ एप्रिल, २०१६ अन्वये सद्य:स्थितीत सन २०१४-१५ मधील संत गाडगे बाबा ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत कोणत्याही स्तरावरील पुरस्कार रक्कमांचे वितरण करण्यात येऊ नये," अशा सूचना देण्यात आल्या. त्यानुसार बुलढाणा जिल्हा परिषद अंतर्गत सन २०१४-१५ या वर्षातील संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत बक्षिसांची रक्कम ग्रामपंचायतींना वितरीत करण्यात आली नाही.

(४) या प्रकरणात शासनाच्या दिनांक ११ एप्रिल,२०१६ अन्वये सद्य:स्थितीत सन २०१४-१५ मधील संत गाडगे बाबा ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत कोणत्याही स्तरावरील पुरस्कार रक्कमांचे वितरण करण्यात येऊ नये, अशा सूचना देण्यात आल्या असल्याने पुढील काहीही कार्यवाही अपेक्षित नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमांतर्गत मार्च २०१८ अखेर १०० टक्के शाळा डिजिटल करण्यास अपयश आल्याबाबत**

**(४०) ११९२६८ (२०-०७-२०१८). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.संग्राम थोपटे (भोर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमांतर्गत आतापर्यंत ४७ हजारांहून अधिक शाळा प्रगत तर ६३ हजाराहून अधिक शाळा डिजिटल झाल्या असल्याचे महाराष्ट्राच्या आर्थिक पहाणी अहवालात नमूद करण्यात आले असून मार्च २०१८ अखेरीस १०० टक्के शाळा डिजीटल करण्याचे उद्दीष्ट साध्य करण्यास शासनाला अपयश आल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने १०० टक्के शाळा प्रगत व डिजिटल करण्याबाबत कृती कार्यक्रम आखला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यानुसार १०० टक्के शाळा प्रगत व डिजिटल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (३०-१०-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मालेगाव (जि.नाशिक) शहरातील उर्दू घरात सुविधा उपलब्ध करण्याबाबत**

**(४१) ११९३५४ (२०-०७-२०१८). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगाव (जि.नाशिक) शहरातील सर्वे नं.१६९ या भूखंडावर अल्पसंख्यांक विभागामार्फत लाखो रुपये खर्च करुन बांधण्यात येत असलेल्या उर्दू घरात उपयुक्त सुविधा उपलब्ध नसल्याने सदर इमारतीचा वापर होत नसुन त्यामुळे शासनाचे होत असलेले नुकसान

टाळण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. अल्पसंख्यांक मंत्री यांना उपयुक्त सुविधांच्या उपलब्धतेसाठी अतिरिक्त प्रस्तावास मान्यता देण्याबाबत दिनांक १५ फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०५-१०-२०१८) :** (१) व (२) अशंत खरे आहे. मालेगाव शहरातील सर्वे नं.१६९ मधील उर्दू शाळा क्र.६४ च्या जवळील २०,००० चौ.फु.क्षेत्रफळाचा भुखंडावर उर्दू घर बांधण्याचा रु.४ कोटी (रुपये चार कोटी मात्र) किंमतीच्या अंदाजपत्रकास शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग क्र.अविवि/ २०१५/ प्र.क्र.५५/ कार्या-४, दि.२१ मे,२०१५ अन्वये मान्यता प्रदान केली आहे. त्यानुसार सदर उर्दू घरासाठी रु.४.०० कोटी इतके अनुदान ही शासनाकडून वितरित करण्यात आले आहे. तद्नंतर सदर उर्दू घराच्या अतिरिक्त कामासाठी मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नाशिक यांनी प्रस्ताव सादर केला होता. सदर प्रस्तावाची सार्वजनिक बांधकाम विभागाकडून छाननी करुन रु.७,८४,१५,९६६.०० (रुपये सात कोटी चौऱ्याऐंशी लाख पंधरा हजार नऊशे सहासष्ट मात्र) किंमतीच्या सुधारित अंदाजपत्रकास दि.२३.०८.२०१८ च्या शासन निर्णयान्वये सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बुलढाणा जिल्हयातील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणांतर्गत रिक्त पदे भरण्याबाबत

**(४२) ११९४३५ (२३-०७-२०१८). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्हयातील महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अंतर्गत शाखा अभियंता, सहाय्यक अभियंता, कनिष्ठ व वरिष्ठ लिपिक, वाहन चालक, अनुरेखक, सहाय्यक अनुरेखक, शिपाई, भांडारपाल व चौकीदार अशा विविध संवर्गातील ४५ पदे रिक्त असल्याने जिल्हयातील देऊळघाट व ४ गांवे, रोहिणखेड व १२ गांवे, जळगांव जामोद व १४० गांवे, हिंगणे गव्हाड व १३ गांवे यांच्या सह अनेक प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेची कामे रखडली असल्याचे माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेंची कामे प्रलंबित असल्याने सदर गावात तीव्र पाणी टंचाई निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार बुलढाणा जिल्ह्यातील रिक्त पदे भरुन पाणी पुरवठा योजनांची प्रलंबीत कामे पूर्ण करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०४-१०-२०१८) :** (१) व (२) बुलढाणा जिल्यात १३ तालुके असून त्याकरिता १ विभागीय व ४ उपविभागीय कार्यालये आहेत. त्यात विविध संवर्गातील ८० मंजूर पदे असून ३२ पदे भरली व ४८ पदे रिक्त आहेत. विभागातील रिक्त पदांचा कार्यभार कार्यरत कर्मचा-यांकडे देण्यात आलेला आहे. विभागांतर्गत देऊळघाट धाड व ६ गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेस दि.१६.८.२०१८ ला सुधारित प्रशासकीय मान्यता मिळाली असून कामे सुरु करण्यात येत आहेत. रोहिणखेड व १२ गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेच्या सर्व गावांना दि.१.४.२०१५ पासून पाणी पुरवठा सुरु करण्यात आला आहे. जळगांव जामोद व १४० गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेतील गावांना दि.११.४.२०१७ पासून टप्याटप्याने पाणी पुरवठा सुरु करण्यात आला असून, सद्य:स्थितीत १०८ गावांना नियमित पाणी पुरवठा सुरु आहे. सदर योजना डिसेंबर, २०१८ पर्यंत पुर्ण करण्याचे नियोजन आहे. हिंगणे गव्हाड व १३ गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेतील ५ गावांना मार्च, २०१८ पासून नियमित पाणी पुरवठा सुरु असून डिसेंबर, २०१८ पर्यंत योजना पूर्ण करण्याचे नियोजन आहे. प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेशी संबंधित गावांमध्ये मार्च, २०१८ च्या उन्हाळयात टंचाई भासली असे आढळून आलेले नाही.
(३) व (४) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील पदांचा आकृतीबंध निश्चित करण्याची कार्यवाही सुरु असून, पदांचा आकृतीबंध अंतिम झाल्यानंतर रिक्त पदे भरण्याबाबत शासन धोरणानुसार कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे.

---

**लोणार (जि.बुलढाणा) तालुक्यातील व्दारपोच योजनेंतर्गत देण्यात येणाऱ्या धान्याची वाहतूक बंद केल्याबाबत**

**(४३) ११९७८७ (२३-०७-२०१८). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात शासनाने ग्रामीण भागातील तथा शहरी भागातील स्वस्त धान्य घरपोच मिळण्याकरिता सुरु केलेल्या द्वारपोच योजनेअंतर्गत लोणार (जि.बुलढाणा) तालुक्यातील कंत्राटदाराने एक महिन्यापासून धान्य वाहतूक बंद केल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०४-१०-२०१८) :** (१) बुलढाणा जिल्ह्यातील लोणार तालुक्यामध्ये दुसऱ्या टप्प्यातील अन्नधान्याची वाहतूक दि. २३ एप्रिल, २०१८ ते दि. ०८ मे, २०१८ या कालावधीत बंद होती, हे खरे आहे.

(२) यासंदर्भात वाहतूक कंत्रटदार श्रीनाथ ट्रान्सपोर्ट कं. यांना दिनांक २५ मे, २०१८ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती. टेंभूर्णा खामगाव या भारतीय खाद्य महामंडळाच्या बेसडेपोतून जसे की, हमालांच्या वादामुळे, रॅक लागणे, डी.ओ.वळती करणे, सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी साठा अधिक्षक, भारतीय खाद्य निगम, खामगांव यांचेकडून उचल न मिळणे यामुळे विहित मुदतीत धान्याची उचल झाली नाही. त्यामुळे धान्य उचलीस उशीर झाला. लोणार तालुका हा या बेसडेपोपासून लांब असल्याने या तालुक्यात धान्याची पोच उशिराने झाली. लोणार तालुक्यातील माहे मे महिन्यातील धान्याचे वितरण विलंबाने माहे जून मध्ये करण्यात आलेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील भेसळयुक्त दुधाच्या विक्रीवर प्रतिबंध घालण्यासाठी शिक्षेच्या कायदयात बदल करण्याबाबत

**(४४) १२००७० (२०-०७-२०१८). श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील भेसळयुक्त दुधाच्या विक्रीवर प्रतिबंध घालण्यासाठी केंद्र शासनाने फौजदारी कायद्यात बदल करण्यास परवानगी दिली असल्याने दुध भेसळ करणा-या आरोपीला सहा महिन्यांपर्यंत असलेली शिक्षेची मर्यादा कमीत कमी तीन वर्षे तर जास्तीत जास्त जन्मठेपेपर्यंत करण्याकरीता फौजदारी अधिनियमातील कलम २७२ ते २७६ मध्ये सुधारणा करण्याचे आश्वासन मा.अन्न व नागरीपुरवठा मंत्री महोदयांनी माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिलेल्या आश्वासनाच्या अनुषंगाने दुध भेसळ रोखण्यासाठी उक्त अधिनियमात शासनाने सुधारणा करण्यासाठी अध्यादेश आणून त्यास मंजूरी देऊन त्याची तात्काळ अंमलबावणी करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१२-०९-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) उक्त अधिनियमात सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील विशेषत: संग्रामपूर (जि.बुलढाणा) येथील राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेच्या लाभार्थ्यांना अन्नधान्याचे नियमित वाटप करण्याबाबत**

**(४५) १२०७१० (२०-०७-२०१८). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील रास्त भाव दुकानदारांच्या माहे एप्रिल, २०१८ मध्ये होणा-या संपाच्या पार्श्वभुमीवर राष्टीय अन्नसुरक्षा योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना वाटप करण्यात येणाऱ्या ५ किलो अन्नधान्याची उचल करुन विहीत वेळेत वाटप करण्याकरीता लोकप्रतिनिधींनी संबंधितांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संग्रामपूर (जि.बुलढाणा) तालुक्यात सन २०१४ नंतर शेतकरी कुटंबाना उपरोक्त योजनेचा लाभ मिळाला नसल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१२-१०-२०१८) :** (१) मा.लोकप्रतिनिंधीचे पत्र प्राप्त न झाल्याबाबत जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय बुलढाणा यांनी कळविले आहे. तथापी एप्रिल, २०१८ च्या संपाच्या अनुषंगाने या शासन पत्र क्रमांक अधापु-२०१८/ प्र.क्र.३५/नापू-२२ यांच्या दिनांक २२ मार्च, २०१८ च्या पत्रान्वये नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, उपआयुक्त. (पुरवठा), (सर्व), जिल्हा पुरवठा अधिकारी (सर्व), अन्नधान्य वितरण अधिकारी (सर्व) यांना रास्तभाव दुकानदारांच्या माहे एप्रिल,२०१८ मध्ये होणा-या संपाच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय अन्न सुरक्षा यांजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांसाठी अन्नधान्याची उचल करून विहित वेळेत वाटप करण्याबाबत कळविण्यात आले होते.

(२), (३) व (४) हे खरे नाही. शेतकरी कुटुंबांना एपीएल शेतकरी योजनेअंतर्गत अन्नसुरक्षा योजनेप्रमाणेच दरमहा वाटप करण्यात येत असून माहे मे, २०१८ मध्ये ९२२.७५ क्विं. गहू व २३१.०२ क्विं. तांदुळ धान्याचे वाटप करण्यात आलेले आहे.

---

**राज्यातील घटस्फोटित, विधवा तसेच अनाथ महीलांच्या बालकांना तसेच दिव्यांग बालकांना शाळा प्रवेशात जागा राखीव ठेवण्याबाबत**

**(४६) १२२८४३ (२३-०७-२०१८). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील घटस्फोटित आणि विधवा महिलांच्या तसेच अनाथ यांच्या बालकांना आणि दिव्यांग बालकांना शाळा प्रवेशात २५ टक्के कोटयांतर्गत जागा राखीव ठेवण्याचा निर्णय राज्य शासनाचे घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निर्णयाने स्वरुप काय आहे व त्याची अंमलबजावणी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार उक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२९-१०-२०१८) : (**१) हे अंशत: खरे आहे.
(२) दिव्यांग बालकांचा समावेश वंचित घटकात केला आहे. घटस्फोटीत/विधवा महिलांच्या बालकांचा तसेच अनाथ बालकांचा समावेश दुर्बल घटकात असल्यास आरटीई २५ टक्के प्रवेशाचा लाभ घेता येतो. या बालकांना आरटीई २५ टक्के प्रवेशासाठी कोणती कागदपत्रे आवश्यक आहेत याबाबत दि.१६ जानेवारी, २०१८ रोजीच्या शासन निर्णयात तरतूद केली आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कांदीवली व दहिसर (मुंबई)येथील आईस्क्रिम पार्लरवर केलेल्या कारवाईबाबत

**(४७) १२३२७८ (२०-०७-२०१८). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील कांदिवली व दहिसर मधील आईस्क्रिम उत्पादन करणा-या दोन कंपन्यांवर अन्न व औषध प्रशासनाने धाड टाकून कारवाई केल्याचे दिनांक २२ मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जप्त केलेल्या मालाचे तपासणी अहवाल प्रयोगशाळेतून प्राप्त झाले आहेत काय, त्या अहवालाच्या अनुषंगाने दोषी असलेल्या व्यक्तिंवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (३१-०८-२०१८) :** (१) हे खरे आहे.
अन्न व औषध प्रशासनाने दि.१७.०५.२०१८ रोजी मे.सुपर स्टार मिना आईसक्रिम, दहिसर (प.), मुंबई. व दि.१९.०५.२०१८ रोजी मे. दिप्ती डेझर्टस्, कांदीवली (प.), मुंबई येथे धाड टाकून कारवाई केली आहे.
(२) उपरोक्त प्रकरणांतील अन्न नमुन्यांचे विश्लेषण अहवाल प्राप्त झालेले आहेत. सदर प्रकरणी कमी दर्जाच्या मलई कुल्फी विक्री, उत्पादन, साठा तसेच अस्वच्छ जागेत उत्पादन केल्याने मे.सुपर स्टार मिना व आईस्क्रिम (बटर स्कॅाच) मध्ये लेबलदोष आढळल्याने मे.दिप्ती डेझर्टस् या दोन्ही पेढीविरुध्द न्यायनिर्णय अधिकारी, बृहन्मुंबई यांचेकडे न्यायनिर्णय खटला दाखल करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाकी व रायपूर (ता.भातकुली, जि.अमरावती) गावात स्वच्छता अभियान अयशस्वी झाल्याबाबत**

**(४८) १२३७८० (२५-०७-२०१८). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाकी व रायपूर (ता.भातकुली, जि.अमरावती) गावातील अनेक ठिकाणी रस्त्यांवर कचरा साचून सर्वत्र अस्वच्छतेचे वातावरण निर्माण झाल्याचे दिनांक १३ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गावातील स्वच्छता अभियान अयशस्वी झाल्याने येथील नागरीकांचे आरोग्य धोक्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी जबाबदार असणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०८-१०-२०१८) :** (१) वाकी व रायपूर गावांत अस्वच्छता पसरल्याबाबत स्थानिक दैनिकात दिनांक २२/०४/२०१८ रोजी बातमी प्रसिध्द झाली होती. त्यानुषंगाने या गावांना विस्तार अधिकारी (आरोग्य) यांनी प्रत्यक्ष भेट दिली. तेव्हा गावात अंशत: अस्वच्छतेचे वातावरण दिसले. त्यावरुन गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भातकुली यांनी प्रत्यक्ष भेट देवून मोका पाहणी केली, ग्रामपंचायतीमार्फत सचिव यांना नाली सफाई, कचरा व उकीरडे उचलणे इत्यादी कामे करुन घेण्याचे निर्देश दिले, सदरची कार्यवाही विहित मुदतीत न केल्यास महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम,१९५८ चे कलम ३९(१) नुसार कार्यवाहीबाबत निर्देश दिले. त्यानुसार ग्रामपंचायतमार्फत गावातील सर्व नाल्यांची सफाई करण्यात आली. गावातील कचरा व उकिरडे उचणे संदर्भात माहे जून,२०१८ मध्ये ग्रामपंचायतीमार्फत मासिक सभा घेवून या संदर्भात ३९ नागरीकांना नोटीस देण्यात आल्या. त्यानुसार १० नागरीकांनी उकीरडे उचलण्याची कार्यवाही केली. उर्वरीत उकीरडे उचलण्याची कार्यवाही सद्य:स्थितीत सुरु आहे.

(२) हे खरे नाही.

वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, आष्टी यांच्या अहवालानुसार सदर गावात एप्रिल,२०१८ ते जून, २०१८ पर्यंत कोणत्याही प्रकारचा साथरोग उद्भवलेला नाही किंवा आजाराची लागण झालेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुक्ताईनगर (जि.जळगांव) येथे अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांकरीता नवीन शासकीय तंत्रनिकेतन संस्थेमध्ये संगणक अभियांत्रिकी हा अभ्यासक्रम सुरु करणेबाबत.**

**(४९) १२४०७१ (२०-०७-२०१८). श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुक्ताईनगर (जि.जळगांव) येथे अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांकरीता नवीन शासकीय तंत्रनिकेतन संस्थेमध्ये इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलिकम्युनिकेशन अभ्यासक्रमाऐवजी संगणक अभियांत्रिकी हा अभ्यासक्रम सुरु करणेबाबत दिनांक १९ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास स्थानिक लोकप्रतिनिधींनी प्रधान सचिव (अल्पसंख्याक विकास) व संचालक (तंत्रशिक्षण संचालनालय) यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आले व त्यानुसार संगणक अभियांत्रिकी हा अभ्यासक्रम सुरु करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०४-१०-२०१८) :** (१) होय.

(२) सदर प्रकरणाची छाननी करून आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत उच्च व तंत्रशिक्षण विभागाला कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे शहरातील सांस्कृतिक व ऐतिहासिक वास्तुंच्या देखभालीबाबत**

**(५०) १२६३७२ (२३-०७-२०१८). प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील शनिवारवाडा, पाताळेश्वर मंदिर, आगाखान पॅलेस या सांस्कृतिक व ऐतिहासिक वास्तू पाहण्यासाठी देश, विदेशातील पर्यटक येत असून परिसरातील अतिक्रमणामुळे या वास्तु विद्रूप होत असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पर्वती टेकडी वर प्रेमी, व्यसनी व्यक्तींच्या वावरामुळे कचरा निर्माण होत असून धुळीमुळे शनिवार वाड्यातील चित्रांची दुरवस्था झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार वास्तुंच्या देखभालीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२३-१०-२०१८) : (**१), (२) व (३) पुणे शहरातील शनिवारवाडा, पाताळेश्वर मंदिर, आगाखान पॅलेस या वास्तु विद्रूप होत असल्याची तसेच शनिवार वाड्यातील चित्रांची दुरावस्था होत असल्याची बाब निदर्शनास आली नाही. या वास्तु केंद्र संरक्षित स्मारके आहेत. शनिवारवाडयात असलेल्या चित्रांबाबत भारतीय पुरातत्व सर्वेक्षण मंडल, मुंबई जागरुक असून सदर चित्रांच्या संवर्धनासाठी रासायनिक शाखा औरंगाबाद तसेच जतन सहायक, पुणे उपमंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने अंदाजपत्रक तयार केल्या जात असून येत्या आर्थिक वर्षात सदर चित्रांच्या संवर्धनाचे काम हाती घेण्यात येणार असल्याचे अधिक्षक पुरातत्वविद्, भारतीय पुरातत्व सर्वेक्षण मंडल, मुंबई मंडल यांनी कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.